**"सप्टेंबर २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद या संस्थेला अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन खर्चासाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून रु.१२.०० लाख इतके अनिवार्य ३६ सहायक अनुदान (वेतने) (तिसरा हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.
- दिनांक २ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४/अ अंतर्गत कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील ६ उमेदवारांना मंत्रालयीन विभागात नियमित पदस्थापना देण्यात आली आहे.
- दिनांक ७ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये यशदा, पुणे / ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता (प्रशिक्षण शुल्क) सन २०२०-२१ करिता ऑनलाईन व ऑफलाईन झालेल्या / होणाऱ्या प्रशासकीय प्रशिक्षण खर्चाकरिता प्रशिक्षण शुल्क दरानुसार एकूण रु.३००.०० लाख इतका प्रशिक्षण खर्च चालू वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या सहायक अनुदानातून वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ९ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या ८ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ९ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये सेवाप्रवेश नियमांचा आदर्श नमुना विहित करण्यात आला आहे.
- दिनांक १४ सप्टेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकाऱ्याचे पती / पत्नी अथवा जवळचे नातेवाईक हे थेट संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली नेमले जाणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
- दिनांक १४ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ करिता वनामती नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या बाबीखाली सप्टेंबर २०२१ व सातवा वेतन आयोग थकबाकीचा दुसरा हप्त्याच्या रकमेसह वेतनाकरिता रु.७,४६,२९२/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.
- दिनांक २१ सप्टेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये "Central Govt. employees retired during the period from January २०२० to June २०२१ – Calculation of Gratuity and Cash payment in lieu of Leave regarding" या विषयाचे केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक ७ सप्टेंबर २०२१ च्या कार्यालयीन ज्ञापन महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील दिनांक १ जानेवारी २०२० ते ३० जून २०२१ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या माहितीस्तव सादर करण्यात आले आहे.
- दिनांक २३ सप्टेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार राज्यात कार्यरत अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांविरुद्ध लैंगिक छळाच्या तक्रारींच्या चौकशींचे संनियंत्रण करण्याकरिता संनियंत्रण समिती व सदर तक्रारींच्या चौकशीकरिता अंतर्गत तक्रार समिती गठित करण्यात आली आहे.
- दिनांक २७ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट-अ व गट-ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २०२० पासून लागू करण्यात आले आहे. त्यानुसार शासकीय सेवेत असतना गट-अ व गट-ब मधील दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा नियुक्ती अनुज्ञये करण्यात आली आहे.

- दिनांक २७ सप्टेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ या संवर्गातील एका परिविक्षाधीन अधिकाऱ्याचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ३० सप्टेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये "One Week In-Service training programme for the year 2021-22 for AIS Officers (IAS, IPS & IFoS), Officers working under the Central Staffing Scheme and Central Secretariat Service (CSS) / Central Secretariat Stenographers Service (CSSS) officers" या विषयाचे केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे दिनांक २२ सप्टेंबर २०२१ रोजीचे कार्यालयीन ज्ञापन माहितीव उचित कार्यवाहीस्तव सादर करण्यात आले आहे.
- दिनांक २९ सप्टेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये मंत्रालयीन विभागात कार्यरत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकां-मधील माहिती ई-सेवापुस्तक आज्ञावलीत भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागातील कार्यासन-९अ यांच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखाली पाच लिपिक-टंकलेखकांचा एक गट (Cell) स्थापन करण्यात आला आहे.

**<u>(ख) प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक ७ सप्टेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचया कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी यांचे सन २०२१ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग दिनांक २० सप्टेंबर २०२१ ते १२ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत परिषद सभागृह, मंत्रालय येथे आयोजित करण्यात आले आहे.

**<u>(ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- ५ सहायक कक्ष अधिकारी, १ उच्चश्रेणी लघुलेखक अशा ६ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याच्या बदलीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- १ कक्ष अधिकारी, १ निवडश्रेणी लघुलेखक अशा २ अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- चार कक्ष अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका उच्चश्रेणी लघुलेखकाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

*****